महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ०५ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ४ मे २०२१ ते सोमवार १० मे २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

### सुविचार

राग आणि वादळ समान आहे. शांत राहिल्यानंतरच एखाद्याला समजते कि किती नुकसान झाले.

## देशात पुन्हा लॉकडाऊन? वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयानं केंद्राला दिला महत्त्वाचा सल्ला





**नवी दिल्ली/मुंबई (योगेश होळंब)-** देशभरात मागील काही काळापासून कोरोनानं अक्षरशः थैमान घातलं आहे. दररोज जवळपास चार लाख नवे रुग्ण समोर येत आहेत. अशात परिस्थितीत कोरोनासोबत लढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं सरकारला अनेक महत्त्वाचे सल्ले दिले आहेत. न्यायालयानं कोरोना नियंत्रणात आणण्यासाठी लॉकडाऊनचा सल्लाही दिला आहे. याशिवाय लस खरेदीची पॉलिसीही पुन्हा एकदा बदलण्यास न्यायालयानं सांगितलं आहे. न्यायालयानं असं म्हटलं आहे, की जर तसं केलं नाही तर हा सार्वजनिक आरोग्याच्या अधिकारास अडथळा असेल, जो घटनेच्या कलम २१ मधील अविभाज्य भाग आहे. इंग्रजी वृत्तपत्र इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, न्यायमूर्ती डी वाय चंद्रचूड, एल नागेश्वर राव आणि एस. रवींद्र भट यांच्या खंडपीठाने असंही म्हटलं आहे, की लॉकडाऊन करण्यापूर्वी त्याचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम कमी होईल याची काळजी सरकारने घ्यावी. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, ज्यांना लॉकडाऊनचा त्रास होऊ शकतो त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था केली पाहिजे. सध्या देशभरात रुग्णालयांबद्दल असंतोषाची परिस्थिती आहे. लोक रुग्णालयात बेड नसल्याबद्दल तक्रारी करत आहेत. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला रुग्णालयात प्रवेशासाठी राष्ट्रीय धोरण आखण्याचा सल्ला दिला आहे. कोर्टाने दोन आठवड्यांत हे धोरण तयार करण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, स्थानिक रहिवासी पुरावा किंवा ओळखपत्र नसल्यामुळे रुग्णालयात दाखल करणं किंवा आवश्यक औषधे नाकारली जाऊ नयेत. गेल्या महिन्यात २० एप्रिल रोजी केंद्र सरकारने लस खरेदीसंदर्भात नवीन सुधारित धोरण जाहीर केले. केंद्राने असे म्हटले होते, की आता ते केवळ ५० टक्के लस खरेदी करतील. तर उर्वरित ५० टक्के लस आता थेट राज्य आणि खासगी कंपन्यांना महागड्या दराने खरेदी करता येणार आहे. परंतु सुप्रीम कोर्टाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने लसींची खरेदी केंद्रीकृत करण्याची आणि राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील वितरणाचे विकेंद्रीकरण करण्याची सूचना दिली आहे.

### थोडक्यात

## कर्नाटकात ऑक्सिजन अभावी २४ जणांचा मृत्यू

**चामराजनगर (वृत्तसंस्था) :** कर्नाटकातील चामराजनगर येथील सरकारी रुग्णालयात ऑक्सिजनच्या अभावामुळे २४ रुग्णांचा मृत्यू झाला. यापैकी २३ जण हे कोरोना संक्रमित होते, तर एका रुग्णाला इतर कारणामुळे ऑक्सिजनवर ठेवण्यात आले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, चामराजनगरमधील सरकारी रुग्णालयाला शेजारील म्हैसूर जिल्ह्यातून ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात येतो. पण रविवारी हा पुरवठा नेहमीप्रमाणे होऊ शकला नाही. परिणामी, ऑक्सिजनअभावी रुग्णांचा मृत्यू झाला. मृतांच्या नातेवाईकांनी रुग्णालयाबाहेर मोठी गर्दी केली होती. सध्या तेथील परिस्थिती नियंत्रणात असून राज्य सरकारने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यावरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरवात झाली आहे.

## कोरोना काळात SBI आली पुढे; कोट्यवधींची मदत

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** कोरोनाने देशभरात हाहाकार माजवला आहे. कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून मृतांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दुसरीकडे देशात आरोग्य सुविधांचा तुटवडा जाणवत आहे. बेड्स, ऑक्सिजन आणि आयसीयू बेड्सची देशात कमतरता आहे. अशात अनेकांनी पुढाकार घेत कोरोना काळात मदतीचा हात पुढे केला आहे. देशातील सर्वात मोठी बँक स्टेट बँक ऑफ इंडियानेही मोठी मदत केली आहे. कोरोना परिस्थितीशी लढण्यासाठी एसबीआयने कोट्यवधींची मदत केली आहे. देशात कोरोना परिस्थिती गंभीर बनत आहे. अशात एसबीआय मदतीसाठी पुढे आली असून ७१ कोटींची मदत केली आहे. तसेच बँकेने ३० कोटी रुपये देशातील सर्वाधिक प्रभावित झालेल्या राज्यासाठी देण्याचा निर्णय घेतलाय. ही मदत १००० बेड्सची सुविधा असलेल्या हॉस्पिटल्सच्या निर्माणासाठी, २५० आयसीयू बनवण्यासाठी देण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलंय. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलंय.

## नंदीग्राममध्ये पराभव: ममतादीदींना CM बनण्यासाठी पुन्हा लढवावी लागणार निवडणूक?

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** गेल्या अनेक दिवसांपासून सर्वांच्या नजरा खिळलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांचा निकाल समोर आला असून तृणमूल काँग्रेसनं मोठा विजय मिळवला आहे. विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने भाजपाचा पराभव केला असला तरी राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी नंदीग्राममधून पराभूत



झाल्या आहेत. पश्चिम बंगालमधील हॉट सीट मानल्या जाणाऱ्या नंदीग्राममध्ये जसा अंदाज लावला जात होता तसाच निकाल समोर आला आहे. सुरुवातीला तर हेच स्पष्ट होऊ शकलं नाही की नंदीग्राममधून शुवेंदु अधिकारी यांचा विजय झाला आहे की ममता बॅनर्जींनी बाजी मारली आहे. एएनआय या वृत्तसंस्थेनं आधी ममता बॅनर्जी यांचा विजय झाल्याचा दावा केला होता, मात्र नंतर ममता यांनी स्वतः पत्रकार परिषद घेत आपल्या पराभवाची माहिती दिली.

(शेष पृष्ठ २ वर)

## लशीची ऑर्डर दिली नसल्याचा अदर पूनावालांचा आरोप खोटा; केंद्राचा खुलासा

**मुंबई (प्रथमेश चव्हाण):** कोरोनाच्या लशींची नवी ऑर्डर केंद्र सरकारने दिलीच नसल्याच्या माध्यमांमध्ये आलेल्या आरोपांच्या बातम्यांना आता केंद्र सरकारने उत्तर दिलं आहे. या प्रकारच्या बातम्या या निराधार आहेत, असं स्पष्टीकरण केंद्र सरकारने दिलं आहे. अदर पूनावालांनी केलेल्या आरोपावर आता केंद्र सरकार आपली बाजू



मांडण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्र सरकारने ऑर्डरच दिली नसल्याचा आरोपावर आपला बचाव करण्याचा प्रयत्न या खुलाशातून करण्यात आला आहे. लशीची ऑर्डर न मिळाल्याचे अदर पूनावालांनी केलेले आरोप आता केंद्र सरकारने फेटाळून लावले आहेत. केंद्र सरकारने सीरमकडे १० कोटी तर भारत बायोटेककडून २ कोटी लशींची ऑर्डर देण्यात आली होती, असं सांगितलं आहे. सरकारने या सीरमला रु.१,७३२.५० कोटींची रक्कम दिली आहे, ज्यामधून मे, जून आणि जुलै महिन्यात आपल्याला लस मिळतील, (शेष पृष्ठ २ वर)

## राज्यासाठी आतापर्यंतची सर्वात दिलासादायक बातमी; लवकरच दुसरी लाट ओसरणार

**मुंबई (विशाल पाटील)-** राज्यात कोरोनाच संसर्गामुळे रुग्णांना बिकट परिस्थितीचा सामना करावा लागतोय. कोरोनाची दुसरी लाट आता कधी कमी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याविषयी राज्याच्या टास्क फोर्सचे सदस्य



डॉ. तात्याराव लहाने यांनी माहिती दिली आहे. लॉकडाऊन लागू केल्यानंतर कोरोना रुग्ण वाढीचा दर सध्या स्थिर आहे. काल राज्यात ५६ हजार संख्या होती, ही संख्या अशीच स्थिर राहिली किंवा खाली येऊ लागली तर आलेख खाली येतोय असं म्हणावे लागेल. कोरोना १६ फेब्रुवारी रोजी अमरावतीत आला. जगातील इतर देशांच्या अभ्यासानुसार कोरोना ९० दिवसांनी कमी होत असतो. त्यामुळे १५ मे ते २५ मे च्या दरम्यान कमी होताना दिसेल. नागपूरात ५ स्ट्रेन आढळले आहेत. हा विषाणू दोन प्रकारे पाहिला पाहिजे. आपल्या देशात ५ नव्हे तर १ हजार स्ट्रेन आढळले आहेत.

## चंद्रकांत पाटील यांचे महाविकास आघाडीतील सर्व पक्षांना आव्हान

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** पश्चिम बंगालसह पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. यात सध्या देशभरात पश्चिम बंगालमधील निकालाची चर्चा सुरू आहे. महाराष्ट्रातही सत्ताधारी पक्ष या निकालावरून भाजपला लक्ष्य करताना दिसत आहे. दरम्यान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सत्ताधारी पक्षांकडून होत असलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. चंद्रकांत पाटील



यांनी महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेला पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक निकाल आणि पंढरपूर मंगळवेढा पोटनिवडणूक निकालाच्या अनुषंगाने थेट आव्हान दिले आहे. यासंदर्भात चंद्रकांत पाटील यांनी एक ट्विट केले आहे. महाराष्ट्रात माझे आव्हान आहे, कोणत्याही निवडणुकीत चारही पक्षांनी वेगवेगळे लढून पाहावे, मग सर्वांना कल्पना येईल की कोणाला किती बोलण्याची पात्रता आहे. तीनही पक्ष एकत्रित असून, सुद्धा पंढरपुरात आमचा पराभव करू शकले नाहीत, मग हे वेगवेगळे लढले, तर भाजपसमोर यांचा निभावही लागणार नसल्याचे म्हणत चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीला प्रत्युत्तर दिले आहे.

## 'या सरकारचा योग्य वेळी करेक्ट कार्यक्रम होईल' देवेंद्र फडणवीस यांचे सूचक विधान

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** पंढरपूर विधनसभा पोटनिवडणुकीत भाजपने विजय मिळवला. भाजपच्या विजयानंतर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन पंढरपूरमधील मतदारांचे आभार मानत



सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. यावेळी त्यांनी माहाराष्ट्रात योग्य वेळी करेक्ट कार्यक्रम केला जाईल, पण आता सध्या कोरोनाचा काळ आहे, आम्ही राज्य सरकारला पूर्ण मदत करत आहोत, योग्यवेळी कार्यक्रम केला जाईल तेव्हा घडामोडी कळतीलच, असं सूचक विधान फडणवीस यांनी केले. फडणवीसांच्या विधानामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. पंढरपूरच्या निकालानंतर फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, पंढरपूरमध्ये भाजपचा उमेदवार विजयी झाला आहे. त्यामुळे पंढरपूरमधील जनतेचा आभारी आहे. महाविकास आघाडी सरकारच्या गैरकारभाराला जनतेनं देलेलं उत्तर आहे. महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन साम, दाम, दंड, भेद याचा वापर केला. तरी देखील पंढरपूरमधील जनतेने भाजपला साथ दिली. प्रशांत परिचारक, उमेश परिचारक साथ दिली. कोरोना काळात कोणालाच मदत केली नाही त्यामुळे नाराज मतदारांनी सरकारच्या विरोधात मतदान केले. हा निकाल सरकारच्या विरोधातील आहे, असे फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, मी प्रचारसभेत बोललो होतो की, यांचा योग्य वेळी कार्यक्रम करेन. पण आता ती योग्य वेळ नाही. काय करायचे आहे ते योग्य वेळी करेल. त्याच्या घडामोडी या सर्वांनाच पहायला मिळती. (शेष पृष्ठ २ वर)





संपादक:- राकेश शंकर गोरे

# रेमडेसिविरनंतर आता लसींची पळवापळवी?

**अहमदनगरचे खासदार सुजय विखे पाटील यांनी विमानाने रेमडेसिविर आणून लोकांना वाटले. त्यांनी नफेखोरी केली नाही. एमआरपीपेक्षा कमी दराने लोकांना रेमडेसिविर दिले. शासकीय रुग्णालय, शिर्डीच्या रुग्णालयालाही दिले. रेमडेसिविरसाठी लोकांचा प्रचंड दबाव आहे. लोकांना असेच कसे मरू देणार म्हणून लोकप्रतिनिधी स्वतःच्या खिश्यातून रेमडेसिविर आणत आहेत. रेतीघाट किंग, सट्टा किंग असलेले लोकप्रतिनिधी पदरमोड करून लोकांना सुविधा देत असल्याने हीरो झाले आहेत.**

जालना जिल्ह्यात रेमडेसिविरचा महापूर आल्याचीही बातमी वाचली. नंदुरबारच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एका शिवसेना नेत्याला रेमडेसिविरचा मोठा साठा दिल्याचा आरोप आहे. नेते मतदारसंघ मजबूत करण्यासाठी, जनसेवेसाठी आरोग्य सुविधांची पळवापळवी करत आहेत. रेमडेसिविरच्या जिल्हानिहाय वाटपात मोठी असमानता आहे. दमदार नेते, मंत्री त्यांच्या जिल्ह्यात इंजेक्शन पळवून नेत आहेत. राजकीय प्रभावाचा वापर करून सुभे सांभाळत आहेत. हायकोर्टानं कितीही कान पकडू द्या; पण या नेत्यांचे काय चुकले? ज्या तालुक्यात, जिल्ह्यात असे दबंग सुभेदार नाहीत त्यांचे हाल कुत्रे खात नाहीत अशी अवस्था आहे.

कोरोनामुळे किती बाधित झाले, किती मृत्यू झाले आणि किती बरे होऊन घरी गेले याची आकडेवारी रोजच्या रोज सरकारकडून प्रसिद्धीमाध्यमांकडे पाठविली जाते. त्यातील मृत्यूचे आकडे लपविले जात असल्याचा आरोप आहे आणि काही ठिकाणी ते वास्तवही आहे. वृत्तपत्रांमध्ये तशा बातम्या ठिकठिकाणांहून येताहेत. कोणत्या जिल्ह्यात किती कोव्हॅक्सिन, कोविशिल्ड लस, किती रेमडेसिविर दिले जात आहेत याची माहिती शासनाने डॅशबोर्डवर दर दिवशी दिली पाहिजे. वाटपासाठीचे निकष जाहीर केले पाहिजेत. लोकसंख्या की रुग्णसंख्येनुसार लस द्यायची ते ठरवा. मनमानी थांबवा.

एका मंत्र्याच्या जवळच्या नातेवाईकांकडे रेमडेसिवीरचा मोठा साठा असल्याची चर्चा आहे. एकेक इंजेक्शन दलाल ४०-४० हजारात कसे विकतात, याच्या ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहेत. सरकारने रेमडेसिविर वाटपाचे नियंत्रण स्वत:कडे घेतलेले असूनही मोठ्या प्रमाणात काळाबाजार सुरूच आहे. कोरोनामुळे हात तर सगळेच धूत आहेत; पण सरकारमधील व बाहेरचेही बरेच लोक हात धुवून घेत आहेत. लसीकरणासाठी आताच लांबच्या लांब रांगा लागत आहेत. उद्या १८ वर्षे वयावरील लोकसंख्येचे लसीकरण सुरू होईल तेव्हा तर लसीकरण केंद्रे हीच कोरोना प्रादुर्भावाची नवी केंद्रे बनतील. लिहून ठेवा, लाठीमाराची वेळ येईल. लसीकरणाचा कुंभमेळा होईल.

केंद्र सरकार लसींचा पुरवठा करते; पण कोणत्या केंद्रावर किती लसी द्यायच्या याचे नियोजन ही राज्याची जबाबदारी असून, त्यात गोंधळ सुरू आहे. नोंदणीशिवाय लस घेता येत नाही. जेवढ्या लसी उपलब्ध आहेत तेवढीच नोंदणी केली तर लोकांना परत जावे लागणार नाही. लसीकरणापासून आरोग्य सुविधांबाबत शहरी व ग्रामीण असा भेदभाव सुरू आहे. सरकार शहरी आहे की काय?



सगळीकडे फाटले असताना कोणा एकाला कसा दोष द्यायचा? 'कोरोनाचा एंडगेम केला', असा छातीठोकपणे दावा करणारे पंतप्रधान, कोरोनाला हरवणारच असे विश्वासाने सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारितील गाफील राहिलेल्या यंत्रणेला व्हेंटिलेटर, ऑक्सिजनचीही न करता आलेली व्यवस्था अन् कोरोना पळाला असे समजून लग्नापासून तेराव्यापर्यंत सर्वत्र तोबा गर्दी करणारे लोक हे सगळेच जबाबदार आहेत. आरोग्य कर्मचारी, डॉक्टरांना मारहाण करून लोक आणखीच बेजबाबदारीचे प्रदर्शन करीत आहेत. खा. संजय राऊत यांचे एक चांगले की सरकारच्या अधिकारातील विषयावर ते भाष्य करत नाहीत. तो मुख्यमंत्र्यांचा, मंत्रिमंडळाचा अधिकार आहे असे सांगत ते लक्ष्मणरेषा सांभाळतात. मात्र काही मंत्र्यांच्या विधानांनी विसंगती समोर येते. तीन पक्षांच्या सरकारचे सहा-सात अघोषित प्रवक्ते असल्याने तसे घडत आहे. त्या नादात सरकारची द्रौपदी होते. विरोधकांना टीकेची संधी मिळते. मुख्यमंत्री बोलत नाहीत याचा अर्थ कोणीही येऊन बोलावे असा होत नाही. सरकारची भूमिका मांडण्यासाठी एक खिडकी योजना आणली तर बरे होईल. एका मंत्र्यांनी मध्यंतरी दुसऱ्याची कविता स्वत:च्या नावावर खपवली. वाङ्मयचौर्य केले म्हणून काय झाले, मुख्यमंत्र्यांप्रति निष्ठा तर व्यक्त झाली! अनिल देशमुख यांना गृहमंत्रीपदाचा द्यावा लागलेला राजीनामा, त्यांच्या मागे लागलेले सीबीआय चौकशीचे झेंगट आणि विशेष म्हणजे देशमुख यांचा बचाव करण्यात राष्ट्रवादीला आलेले अपयश यामुळे पक्षाचे मंत्री, नेत्यांमध्ये अस्वस्थता असणे स्वाभाविक आहे. देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात पंकजा मुंडे, विनोद तावडे यांच्यासह तीन-चार मंत्र्यांवर आरोप झाले; पण एक खडसे सोडले तर इतरांची फडणवीस आणि भाजपने पाठराखण केली. खडसे यांचा बळी फडणवीसांनी घेतला असे आजही म्हटले जाते.

पान १ वरुन...

## नंदीग्राममध्ये पराभव;...

यानंतर तृणमूलनं केलेल्या ट्विटनं आणखीच गोंधळात टाकलं. यात दावा करण्यात आला, की आणखी मतमोजणी सुरू आहे. जर ममता बॅनर्जी यांचा नंदीग्राममधून पराभव झाला आहे, तर त्या मुख्यमंत्रीपदावर कायम राहाणार का, असा सवाल उपस्थित होतो. निवडणूक विश्लेषकांचं असं म्हणणं आहे, की ममता बॅनर्जी निश्चितपणे पुन्हा एकदा बंगालच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान होतील. बघायला गेल्यास भारतातील तीन सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांचे मुख्यमंत्री नितीशकुमार, योगी आदित्यनाथ आणि उद्धव ठाकरे हे विधानपरिषदेचे सदस्य आहेत मात्र विधानसभेचा भाग नाहीत. सरळ शब्दात सांगायचं झाल्यात मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांनी विधानसभा निवडणुका जिंकल्या नाहीत.

## लशीची ऑर्डर दिली...

असं केंद्राने स्पष्टीकरण दिलं आहे. याशिवाय भारत बायोटेककडे दोन कोटींच्या लशीची ऑर्डर देण्या आली आहे. या लशी पुढच्या तीन महिन्यात येतीलच. मात्र सध्या केंद्र आणि राज्य सरकारकडे मिळून ७५ लाख लशींचे डोस शिल्लक आहेत. याशिवाय आणखी ५९ लाख लशींचे डोस येत्या तीन दिवसात उपलब्ध होतील. या कथित बातम्यांनुसार, दोन लस निर्मात्यांना मार्च २०२१ मध्ये दिलेल्या शेवटच्या ऑर्डर्सनुसार सीरम इन्स्टिट्यूटला १०० दशलक्ष डोसची ऑर्डर तर भारत बायोटेकला २० दशलक्ष डोसची ऑर्डर देण्यात आली होती. माध्यमांतील ऑर्डर न दिल्याच्या बातम्या या पूर्णपणे खोट्या आहेत. या बातम्या वास्तवावर आधारलेल्या नसल्याचा निर्वाळा आरोग्य मंत्रालयाने एका प्रेस रिलीजद्वारे दिला आहे.

## 'या सरकारचा योग्य वेळी...

मात्र आता आपली लढाई कोरोना विरोधातील आहे. आम्ही राज्य सरकारला पूर्ण मदत करत आहोत, योग्य वेळ आली की कार्यक्रम हा होणार, असे त्यांनी स्पष्ट केले. शिवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत यांच्यावर बोरची टीका करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'बेगाने शादी मे अब्दुला दिवाणा' काही जण करत असतात. तसंच संजय राऊत यांचे झाले आहे. शिवसेनेला आता अस्तित्व नाही, महाराष्ट्रातील जनता जिगरबाज होती. तुम्हाला भाजपसोबत निवडून दिले पण तुम्ही दुसरी वाट धरली, असा टोला त्यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावला.

## कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत महागाईचा उडाला भडका

**पारोळ (प्रतिनिधी)-** कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत महागाईचा भडका उडाला असून, रोगप्रतिकारक शक्तीसाठी आवश्यक असलेल्या वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. यामुळे आधीच रोजगार गमावलेल्या सर्वसामान्यांनी जगायचे तरी कसे, असा प्रश्न विचारला जात आहे. दरम्यान, वसई, विरार, नालासोपारा परिसरात कोरोना रुग्णांमध्ये रोज मोठी वाढ होत आहे. आपल्याला कोरोनापासून वाचायचे असेल तर रोगप्रतिकारकशक्ती महत्त्वाची असून ती वाढवण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची मोठी



मागणी आहे. बाजारात अनेक वस्तूंबरोबरच चिकन, मटण, अंडीसुद्धा महाग झाल्याने आता सामान्यांनी आपली प्रतिकारशक्ती वाढवायची कशी, असा प्रश्न विचारला जात आहे. रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यासाठी चिकन, मटण व अंडी खा, असा सल्ला दिला जात आहे. त्यामुळे कडकडीत उन्हाळा असूनही चिकन, मटण व अंड्यांची मागणी वाढत आहे. त्यांचे दरही दुपटीने वाढले आहेत. ब्रॉयलर चिकनला १८० ते २४० रुपये, गावरान चिकनला ३०० ते ३५० रुपये, मटण ७००, तर एका अंड्यासाठी ८ ते १० रुपये मोजावे लागत आहेत. विक्री वाढल्याने विक्रेत्यांना अच्छे दिन आले आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून शेळी व कुक्कुटपालन शेतकरी करत आहेत. त्यामुळे त्यांना या वर्षी चांगला दर मिळत आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेपूर्वी चिकन १५०, तर मटण ६०० रुपये किलोने विकले जात होते. तेच भाव आता वाढले आहेत. गेल्यावर्षी सुरूवातीला चिकन खाण्याबाबत गैरसमजही पसरले होते. आता मात्र आहारतज्ज्ञ चिकन, मटण, अंडी खाण्याचा सल्ला देत असल्याने विक्रीत व किमतीत दुपटीने वाढ झाली आहे. दरम्यान, चिकन, मटण व अंडी विकणाऱ्यांनाही वेळ ठरवून दिल्याने त्यावेळेतच ती विकत मिळतात. त्यामुळे या दुकानांवर गर्दी पाहायला मिळत आहे.

# ठाण्यातील रुग्णालयांचे अग्निसुरक्षेकडे दुर्लक्ष



**ठाणे (तृप्ती गोरे): विरारपाठोपाठ ठाण्यातील मुंब्रा येथे रुग्णालयाला लागलेल्या आगीनंतर रुग्णालयातील अग्निसुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून काही महिन्यांपूर्वी ठाणे महापालिका प्रशासनाने अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण अहवाल सादर करा, अन्यथा कारवाई करण्याचा इशारा खासगी रुग्णालयांना दिला होता. तरीही शहरातील ६२ रुग्णालयांनी अद्याप अग्निशमन विभागाकडे अहवाल सादर केला नसल्याची माहिती समोर आली आहे. पालिकेच्या आदेशाला केराची टोपली दाखवणाऱ्या या रुग्णालयांवर पालिका प्रशासनाने कारवाईचा बडगाही उगारलेला नाही.**

ठाणे शहरात छोटी-मोठी बरीच खासगी रुग्णालये आहेत. परंतु अनेक रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षिततेचे नियम पाळले जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे रुग्णांचा जीव धोक्यात सापडण्याची शक्यता नाकरता येत नाही. अनेकदा रुग्णालयांना फायर एनओसीदेखील नसते. तरीदेखील रुग्णालये चालवली जात असून याच प्रश्नांवर मागे मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. याबाबत न्यायालयाने फायर एनओसी नसलेल्या ठाण्यातील ७० रुग्णालयांवर कारवाईचे आदेश दिले होते. मात्र, महापालिकेच्या तपासणीमध्ये आणखी काही रुग्णालयांकडे फायर एनओसी नसल्याची बाब समोर आल्यानंतर महापालिकेने २०१९च्या मे महिन्यात १५ रुग्णालयांना टाळे ठोकले होते. मात्र, अग्निसुरक्षिततेचे नियम पायदळी तुडवणाऱ्या रुग्णालयांवर महापालिकेकडून करण्यात येणाऱ्या कारवाईमध्ये सातत्य नसल्याचे बोलले जात आहे. राज्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होत असल्याचे दिसून येते.

जानेवारीमध्ये भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयातील शिशु केअर युनिटला लागलेल्या आगीनंतर ठाणे महापालिका प्रशासन सतर्क झाले आणि शहरातील सर्व खासगी रुग्णालयांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण करण्याचे निर्देश पालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी दिले होते. तसेच परीक्षणाचा अहवाल सादर न केल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला होता. त्याचबरोबर व्यावसायिक आस्थापना चालवण्यासाठी आवश्यक असलेले अन्य परवाने न देण्याचा पवित्रा त्यावेळी पालिकेने घेतला होता. पालिका आयुक्तांच्या आदेशानंतर आरोग्य विभागाकडून ३४७ खासगी रुग्णालयांची यादी अग्निशमन विभागाकडे सोपवण्यात आली होती. त्यानंतर पथकांनी रुग्णालयांतील अग्निसुरक्षिततेची पाहणी केली.

# मोकाट फिरणाऱ्यांवर कारवाई, पोलिसांनी उचलली पावले

**नालासोपारा (आकाश कांबळे)-** राज्यात कडक निर्बंध लावले असले तरी नालासोपारा परिसरात संचारबंदीतदेखील काही बिनकामाची माणसे विनामास्क, मोकाट फिरताना दिसतात. अनेकदा आवाहन करूनही नागरिक ऐकत नसल्याने अखेर वसईतील सातही पोलीस ठाण्यांनी पावले उचलून गुरुवारपासून कारवाईला सुरुवात केली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत कारवाईसाठी पथके नेमली आहेत. तर कारवाई करणाऱ्यांची कोरोना चाचणीही केली जात आहे.

कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी कामानिमित्तच बाहेर पडण्याच्या सूचना नागरिकांना केल्या आहेत. मात्र लोक ऐकत नसल्याने पोलिसांनी एक शॉर्ट फिल्म बनवूनही लोकांना घरी राहण्यासाठी विनंती केली होती. मात्र त्याकडेही लोक कानाडोळा करीत असल्याने शेवटी पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली. पोलिसांनी कडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी काही नागरिकांनी केली होती. वसई तालुक्यातील ग्रामीण भागातही कोरोना रुग्ण वाढत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, सिस्टर हेदेखील कोरोनाचे शिकार होत आहेत. शासनाने १४ एप्रिलपासून राज्यात संचारबंदी लागू केली. मात्र याचे नालासोपारा परिसरात पालन होताना दिसत नव्हते. वसई, विरार, नालासोपारा येथे अनेक लोक बिनधास्त विनाकारण फिरताना दिसतात. अशा विनाकारण फिरणाऱ्या व नियम तोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पोलीस अधिकारी आणि कर्मचारी रस्त्यावर उतरले



आहेत. गुरुवारपासून वसई, माणिकपूर, नालासोपारा, तुळींज, वालीव, विरार, अर्नाळा या सातही पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वेगवेगळी पथके तयार करून कारवाई केली जात आहे. गुरुवारी वसई, माणिकपूर, वालीव आणि तुळींज पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विनाकारण फिरणाऱ्या १८९ आणि विनामास्क फिरणाऱ्या १०९ नागरिकांवर कारवाई करण्यात आली. विनाकारण फिरणाऱ्यांची कोरोना चाचणीही करून घेतली जात आहे. तुळींज आणि वालीव येथील ५७ नागरिकांची कोरोना चाचणी केली असून, यात दोन जण पॉझिटिव्ह सापडले.

# ठाणे जिल्ह्यातील मुले बालमजुरीच्या विळख्यात

**ठाणे (शकिल शेख)-** करोनाकाळात बंद असलेल्या शाळा, पालकांचे हरवलेले रोजगार आणि कुटुंबाला मदत करण्याची निकड या पार्श्वभूमीवर शाळेत जाण्याच्या वयातील शेकडो मुले मिळेल त्या मोबदल्यात बालकामगार म्हणून राबत आहेत. गेल्याच महिन्यात भिवंडीमध्ये इमारतीच्या भिंतींना पडलेल्या भेगा भरण्याचे काम करताना विजेचा धक्का बसून दुसऱ्या मजल्यावरून पडून एका बालकामगाराला जीव गमवावा लागला होता. ठिकठिकाणी बालकामगार राबत असून राज्यासह जिल्ह्यात बालमजुरीच्या प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केले आहे. असे असताना, ठाणे जिल्ह्यात कामगार विभागाने अन्य यंत्रणेसोबत सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात टाकलेल्या ११ छाप्यांमध्ये केवळ एकच बालकामगार आणि १७ किशोरवयीन कामगारांची सुटका केली आहे. मागील संपूर्ण वर्ष करोनाकाळात गेले असून लॉकडाउन तसेच अन्य निर्बंधामुळे जास्त कारवाया झालेल्या नसल्याचे कारण कामगार विभागातील अधिकारी देत आहेत. बालकामगारमुक्त महाराष्ट्राच्या केवळ गप्पा मारल्या जात असून प्रत्यक्षात मात्र बालकामगारांना वेगवेगळ्या कामांसाठी जुंपले जात असल्याचे दिसून येते. शाळेत जाण्याच्या वयामध्ये



ही मुले काम करतात. कमी पगारामध्ये बालकामगार मिळत असल्याने मालकवर्गही बालकांना कामावर ठेवून बालकांचे शोषण करत आहेत. मुळात बालकांना कामावर ठेवणे गुन्हा आहे. तरीही मालक कायद्याला जुमानत नाही. गंभीर बाब म्हणजे बालकामगारांकडून धोकादायक कामेही करून घेतली जात असल्याचे दिसून येते. भिवंडीमध्ये १३ वर्ष ७ महिने वय असलेल्या एका बालकामगाराला इमारतीचे रंगकाम आणि भिंतीचे तडे भरण्याच्या कामासाठी ठेवण्यात आले होते. दुर्दैवाने झोल्यात बसून काम करत असताना विजेच्या तारांचा जोरदार धक्का बसला. त्यानंतर दुसऱ्या मजल्यावरून खाली पडलेल्या या बालकाचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी कारवाई करत कंत्राटदारावर गुन्हा दाखल केला. मात्र, वेळीच कामगार विभागाने कारवाई करत बालकाची सुटका केली असती तर कदाचित बालकावर जीव गमवण्याची वेळ आली नसती.

कामगार विभागाकडून नियमित छापेसत्र राबवून बालकामगारांची सुटका केली जाते. सोबत इतरही यंत्रणा असतात. ठाणे जिल्ह्यात सरासरी वर्षाला ३० ते ३५ धाडी टाकल्या जात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, करोनामुळे संपूर्ण कामकाजावरच मोठा परिणाम झाल्याने कारवाईच्या संख्येमध्ये घट झाल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्या वर्षभरात म्हणजेच २०२०-२०२१ या वर्षामध्ये ठाणे जिल्ह्यात ११ धाडी टाकलेल्या आहेत.


**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम), मुख्य कार्यालय विरार दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५६३**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | समेळ-१ | NL०८/२५४/२३ | १०९९८ | ललन कुमार डि. चौधरी | निळकंठ दत्तात्रेय पाटील |
| २ | समेळ-२ | NL०९/६३/१७ | ११०७८ | बाबुराव सदाशिव पाटकर | प्रकाश रामु हडलगेंकर अर्चना प्रकाश हडलगेकर |
| ३ | सोपारा-१ | NL३१/११०/११८ | ११२३६ | किर्ती रमणीकलाल सुतार व निता किर्ती सुतार | मनोज दत्ताराम मोरे |
| ४ | सोपारा-१ | NL३१/१०८/८२ | ११२५० | श्रीधर बाबुराव बांगर/आर.पी. श्रीधर बांगर | रविंद्र बनमाली इपिली / लक्ष्मी बनमाली इपिली |
| ५ | सोपारा-२ | NL३२/३७१/६ | ११२४५ | सलीम अहमद साहेब शेख | शयबाज सलिम शेख |
| ६ | सोपारा-१ | NL३१/७०/३९ | ११३९१ | विष्णु अपार्टमेंट | श्वेता गणेव चाळके व गणेश लक्ष्मण चाळके |
| ७ | सोपारा-१ | NL३१/१७/३ | ११३५५ | बाबासाहेब दत्तात्रय जाधव | औदुंबर चंद्रकांत शिरवडकर |
| ८ | सोपारा-१ | NL३१/६०/३१ | ११३७८ | शहाबुद्दीन शमीउद्दीन शेख | आशा अनिल जयस्वाल |
| ९ | सोपारा-२ | NL३२/५८८/४४ | ११३८४ | जरीना बशीर खान | शबनम अस्लम शेख |
| १० | सोपारा-२ | NL३२/५८८/४३ | १०९८९ | शेखनुर इस्लाम व नूर बहार बेगम | कसम अब्दुल कादर सोपारीवाला |
| ११ | सोपारा-२ | NL३२/४९६/३ | ११४१४ | अब्दुल हसन अ. हमीद शेख | अब्दुल हमीम मोहम्मद |
| १२ | सोपारा-२ | NL३२/४९३/६ | ११४१२ | सुलोचना के. पतयान | बिजेंद्रकुमार दुबे व विभा बिजेंद्रकुमार दुबे |
| १३ | सोपारा-२ | NL३२/५९९/१७ | ११४१३ | मे. खुशी इंटरप्रायझेस | बाप्टिस्टा डॉम्नीक घोंसावलीस |
| १४ | समेळ-१ | NL०८/२७४/८० | ११४२३ | दिलशा युसुफाजी भोजानी व निलम भोजानी | निलम युसूफ अली भोजानी |
| १५ | समेळ-२ | NL०९/१३३/१२ | ११५८० | रामचंद्र एल पटकरे | पुष्पा विठ्ठल सपकाळ |
| १६ | समेळ-२ | NL०९/१८/२ | ११५९८ | रईस अहमद | आशा यशवंत सातपुते |
| १७ | सोपारा-१ | NL३१/६८/८ | ११५९९ | ओम साई बिल्डर्स | दिलीप महादेव दिवाळे व नलीनी दिलीप दिवाळे |
| १८ | समेळ-२ | NL०९/८९/६५ | ११६७५ | राजेश नारायण कोळी | विजय शांताराम पाटणकर व अंकिता विजय पाटणकर |
| १९ | सोपारा-२ | NL३२/१०७/२५ | ११६५६ | खातुमा मो. सलिम व अब्दुल सत्तार कापडिया | मुबारक नसीबुल्लाह खान |
| २० | सोपारा-१ | NL३१/११८/२९३ | १२४२१ | महेंद्र वेनिलाल ओझा/दमयंती एम ओझा | अनिता यशवंत दामले / यशवंत लक्ष्मण दामले |

सही/-

**(धनश्री शिंदे)** सहा. आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
वसई-विरार शहर महानगरपालिका

जा. क्र. व.वि.श.म./क.वि/२६३/२०२१-२२
दिनांक : ०३/०५/२०२१


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**

R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)



# जुलै-ऑगस्टमध्ये तिसरी लाट येण्याची भीती

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** राज्यात करोनाची तिसरी लाट जुलै-ऑगस्ट महिन्यात येणार असल्याचा अंदाज तज्ज्ञांनी वर्तवला आहे. त्यापूर्वी आपण प्राणवायूच्या बाबतीत स्वंयपूर्ण झाले पाहिजे. प्रत्येक तालुक्यात प्राणवायूचा प्रकल्प तयार पाहिजे. प्राणवायूसाठी आज जी धावपळ सुरु आहे, ती तेव्हा होता कामा नाही. तिसऱ्या लाटेच्यावेळी प्राणवायू नाही, अशी सबब कोणालाही सांगता येणार नाही, याची सर्वांना दक्षता घ्यावी ,असे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरूवारी राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले. त्याचप्रमाणे राज्यात निर्बंध आणखी पंधरा दिवस वाढविण्यात आले असून त्याची कठोर अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याची माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून राज्यातील करोना परिस्थितीचा आढावा घेतला. त्यावेळी आरोग्यमंत्री राजेश टोपे तसेच करोना नियंत्रण कृती गटाचे तज्ज्ञ सहभागी झाले होते. राज्यात गेल्या काही दिवसांपासून कठोर निर्बंध लागू असल्याने करोना बाधितांचा आकडा काहींसा नियंत्रणात आला असला तरी आजही ६५ हजारच्या पुढे आहे. त्यामुळे सध्याचे निर्बंध आणखी पंधरा दिवस वाढविण्यात आले असून त्यांची कठोर अंमलबजावणी करावी. लोक विनाकारण घराबाहेर पडणार नाहीत याची पोलिसांनी खबरदारी घ्यावी अशा सूचना देण्यात आल्याचेही टोपे यांनी बैठकीनंतर सांगितले. राज्यात सध्या आवश्यक तितका म्हणजेच १७१५ टन प्राणवायू पुरवला जात आहे. तसेच प्राणवायूची गरज लक्षात घेऊन हवेतून प्राणवायू शोषूण घेणारे १२५ प्रकल्प राज्यभरात उभे राहत असून त्याचे कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यातील काही प्रकल्प येत्या दहा- पंधरा दिवसात सुरूही होतील. तसेच प्राणवायूचा काटकसरीने वापर करण्यासाठी योग्य खबरदारी घेण्यास सांगण्यात आले आहे. गरजेच्या तुलनेत रेमडेसिविरची इंजेक्शन आज दहा ते पंधरा हजार कमी पडत आहेत. त्यामुळे रेमडेसिविरचा वापर मर्यादित प्रमाणात करावा. अनावश्यक वापर करुन त्याचा रुग्णांवर विपरित परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. महानगरामध्ये करोनासह अन्य गंभीर आजारी रूग्णांना आवश्यक ते सर्व उपचार मिळण्याची व्यवस्था आहे. पण ग्रामीण भागातील छोट्या शहरात करोनासह अन्य गंभीर आजार असलेल्या रूग्णावर उपचारासाठी टेलिमेडिसिनचा परिपूर्ण वापर झालाच पाहिजे. त्यासाठी मुंबई, पुण्यातील तज्ज्ञ डॉक्टरांची मदत घेऊन उपचार द्यावेत अशाही सूचना देयात आल्या आहेत.

## बेघर, भिक्षेकऱ्यांच्या भोजनासाठी पालिकेचा पुढाकार

**मुंबई (सम्यक कासारे)-** करोना संसर्गाची साखळी तोडण्यासाठी राज्य सरकारने लागू केलेल्या कडक निर्बंधांचा आधार घेत पुन्हा एकदा महापालिकेने मुंबईमधील बेघर आणि भिकाऱ्यांना अन्नपदार्थ पाकिटांचे वितरण करण्यासाठी सुमारे दोन कोटी २० लाख रुपये खर्च करण्याचा घाट घातला आहे. तब्बल सहा लाख अन्नपदार्थ पाकिटांच्या पुरवठय़ासाठी पालिकेने निविदा जारी केल्या आहेत. दर दिवशी दुपार आणि रात्री मिळून २० हजार अन्नपदार्थ पाकिटांचे वाटप करण्यात येणार आहे. मात्र ठरावीक पुरवठादारांना डोळ्यासमोर निविदा काढण्यात आल्याचा आरोप पालिका वर्तुळात होऊ लागला आहे. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवडय़ापासून मुंबईत पुन्हा करोनाच्या संसर्गाने थैमान घालण्यास सुरुवात केली आहे. करोनाच्या दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्येत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे राज्य सरकारने



कडक निर्बंध लागू केले. अत्यावश्यक वस्तू वगळता अन्य दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. तसेच सर्वसामान्य प्रवाशांसाठी लोकल प्रवासास मनाई करण्यात आली आहे. केवळ सकाळी ८ ते ११ या कालावधीत बाजारपेठा सुरू ठेवण्यात येत आहेत. निर्बंध लागू होताच पहिल्या शनिवार-रविवारी बेघर आणि भिकाऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी पालिकेच्या नियोजन आणि करनिर्धारण व संकलन विभागातील कर्मचाऱ्यांकडून ४० रुपये वर्गणी गोळा करण्यात आली होती. यातील २० रुपये बिस्किट पुडा, तर २० रुपये केळ्यांसाठी खर्च करण्यात आल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिली. त्यानंतर पालिका दप्तरी नोंदणी असलेल्या भिकाऱ्यांना अन्नपदार्थाचा पुरवठा करण्यासाठी काही सामाजिक संस्थांना आवाहन करण्यात आले होते. तीन-चार सामाजिक संस्थांनी अन्नपदार्थ पाकिटांचा पुरवठा करण्याची तयारीही दर्शविली होती.

## राज्यातील शाळांना अखेर सुटी मिळाली

**मुंबई (नितीन देवळेकर)-** मागील वर्षी मार्च २०२० पासून लॉकडाऊन लागले आणि विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण सुरू झाले. तेव्हापासून ऑनलाइन शिक्षणाला सुटीच न मिळाल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांनी अखेर यंदा तरी उन्हाळ्याची सुटी अधिकृतरीत्या जाहीर करावी, अशी मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर शनिवार १ मे २०२१ म्हणजे आजपासून १४ जून २०२१ पर्यंत राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना सुट्या जाहीर करण्याच्या सूचना द्याव्यात असे निर्देश शिक्षण संचालनालयाने सर्व विभागीय उपसंचालकांना दिले आहेत. जून महिन्यातील विदर्भाचे तापमान विचारात घेऊन तेथे २९ जून २०२१ रोजी शाळा सुरू करण्यात येतील. शैक्षणिक वर्षांच्या ठरलेल्या नियोजनाप्रमाणे दरवर्षी मार्चअखेरपर्यंत अध्ययन समाप्ती होऊन एप्रिलमध्ये वार्षिक परीक्षा घेण्यात येतात. त्यानंतर उन्हाळी सुटीला सुरुवात होते.



पण यंदा कोरोनामुळे गणपती आणि दिवाळीतही विद्यार्थी, शिक्षकांना ऑनलाइन अभ्यासातून सुटी दिली नव्हती. पहिली ते अकरावीपर्यंतच्या सर्व वर्गाच्या परीक्षा रद्द करण्यात आल्यामुळे सध्या ऑनलाइन शिक्षणही बंद झाले आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे मिळणारी उन्हाळी सुटी शाळांना जाहीर करावी, अशी मागणी शिक्षण आणि मुख्याध्यापक संघटनांनी लावून धरली होती. अखेर ती मान्य करण्यात आली. शाळांनी अंतर्गत मूल्यमापनाचे काम करून निकालाचे काम पूर्ण करायचे असून, लॉकडाऊन संपल्यावर पहिली ते नववी आणि अकरावीच्या निकालासंदर्भात कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे बारावीच्या परीक्षासंदर्भात अद्याप अंतिम निर्णय न झाल्याने आवश्यकता भासल्यास त्या शिक्षक, कर्मचाऱ्यांना शाळेत उपस्थित रहावे लागणार असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांनी दिली.

## मुंबईत आता दोन मुखपट्ट्या बंधनकारक

**मुंबई (विशाल कारंडे)-** साध्या सुती कापडाची मुखपट्टी वापरणाऱ्यांनी या मुखपट्टीच्या आत 'सर्जिकल' अर्थात वैद्यकीय उपचारांदरम्यान लावण्यात येणारी मुखपट्टी वापरावी, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे. एन ९५ मुखपट्टी व वैद्यकीय मुखपट्टी यांमुळे ९५ टक्के संरक्षण मिळते, तर सुती मुखपट्टीमुळे शून्य टक्के संरक्षण मिळते, असा दावाही पालिकेच्या 'माय बीएमसी' या अधिकृत 'ट्विटर हॅण्डल'वरून करण्यात आला. मात्र हे आवाहन कशाच्या आधारावर केले, असा प्रश्न उपस्थित करत अनेक नागरिकांनी त्यावर आक्षेप नोंदवला आहे. एन ९५ मुखपट्टीची जाहिरात यातून करायची आहे का, तसेच एक मुखपट्टी लावून वावरणेही जिकिरीचे होत असताना दोन मुखपट्ट्या लावून कसे वावरायचे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान 'सुती कापडाच्या मुखपट्ट्या वापरणेही सुरक्षित आहे. मात्र अनेक नागरिक मुखपट्टीचा वापर करताना सतत ती काढून वावरत असल्याने किंवा तिचा योग्य वापर करीत नसल्याने मूळ हेतू साध्य होत नाही. म्हणून एका मुखपट्टीच्या आत आणखी एका मुखपट्टीचा समावेश असावा, असे आवाहन करण्यात आले आहे,' असे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी सांगितले. अनेकदा नागरिक रुग्णालयात, लसीकरण केंद्रावर येतात, पण मुखपट्टी नीट लावलेली नसते, त्यामुळे हे आवाहन करण्यात आल्याचेही ते म्हणाले. मुंबईत विनामुखपट्टी फिरणाऱ्यांविरोधात कारवाई



केल्यामुळे नागरिकांमध्ये मुखपट्टी लावण्याबाबत जागृती निर्माण झाली आहे, मुंबईतील रुग्णसंख्या ओसरण्यामागे हेदेखील मोठे कारण आहे, अशी प्रतिक्रिया पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी व्यक्त केली. पालिकेने गेल्या एप्रिलपासून विनामुखपट्टी फिरणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई सुरू केली. मुंबईकर दंडाच्या भीतीने मुखपट्टी लावत असले तरी अनेकदा ही मुखपट्टी हनुवटीवर किंवा नाकाखाली सरकवलेली असते. ऑक्टोबरमध्ये पहिली लाट ओसरल्यानंतर ही कारवाई अधिक तीव्र करण्यात आली.

## ...तर लसीकरण केंद्रे होतील कोरोनाचे सुपर स्प्रेडेर्स; माजी आरोग्य मंत्र्यांनी व्यक्त केली भीती

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांना कोरोनाच्या तिसऱ्या लाटेपासून वाचवण्यासाठी लसीकरणाचे शिवधनुष्य उचलले हे अभिनंदनीय व स्वागतार्ह आहे. लसीकरण व कोरोनाचा समूह संसर्ग टाळण्यासाठी मुख्यमंत्री सतत आवाहन करत आहे.पण मार्केट गर्दी मधील आणि भाजीवाल्यांची गर्दी पाहिल्यावर नागरिक स्वतःहून कोरोनाच्या स्वाधीन होत आहे. लसीकरण व्हावे म्हणून नागरिक पहाटे पासून तासंनतास उभे राहून एकमेकांच्या संपर्कात येऊन व सोशल डिस्टनसिंग न पाळता लसीकरण केंद्रावर तुफान गर्दी करत आहे.त्यामुळे लसीकरण केंद्रे कोरोनाचे सुपर स्प्रेडेर्स होत असल्याने लसीकरण केंद्रावरील गर्दी कमी केली पाहिजे असे मत राज्याचे माजी



आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत यांनी लोकमतकडे व्यक्त केले. मर्यादित लसींचा साठा, मर्यादित स्टाफ,लस घेतल्या नंतर पुन्हा अर्धा तास लसीकरण केंद्रात थांबवणे या सगळ्या गोष्टींतून कोरोनाचा किती संसर्ग होईल याची कल्पना लसीकरणासाठी जाणाऱ्या प्रत्येकाने करावी असे मत त्यांनी व्यक्त केले. वयोगट १८ ते ४४ यांचे ४४ ते ३५ वर्षे,३५ वर्षे ते २५ वर्षे व २५ ते १८ वर्षे केल्यास राज्यातील ६ कोटी ७४ लाख या गटातील नागरिकांना टप्याटप्याने लस मिळेल असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रात दिवसाला १ लाख नागरिकांचे लसीकरण करण्यास लस उपलब्ध झाल्यास कोरोनाचा वाढणारा संसर्ग मर्यादित राहू शकेल असे डॉ.दीपक सावंत म्हणाले. अजून ६५ वर्षांवरील निम्म्या नागरिकांचे लसीकरण बाकी आहे.तसेच यापैकी लस उपलब्ध झाल्यास फॅमिली फिजिशियन मार्फत दुपारच्या वेळात लसीकरण होऊ शकेल, त्यासाठी एसओपी तयार करणे गरजेचे आहे अशी सूचना डॉ.सावंत यांनी केली.तसेच कोविन अँपवर एकाच वेळी होणारी नोंदणीला होणारी झुंबड उडत असल्याने कोविन अँप क्रॅश होत आहे.म्हणून राज्याने पर्यायी अँप निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा. आणि लसीकरण केंद्र ही कोरोनाची संसर्ग केंद्र होणार नाही,निदान आपण व्यवस्थित दिलेक्या वेळेनुसार काळजी घेऊन येथील गर्दी कमी करावी असे आवाहन त्यांनी केले.

## आंतरराष्ट्रीय विमान प्रवासावरील निर्बंध आणखी महिनाभर कायम

**मुंबई (विशाल कारंडे)-** देशातील वाढता कोरोना प्रादुर्भाव लक्षात घेता आंतरराष्ट्रीय विमान प्रवासावरील निर्बंधांत वाढ करण्याचा निर्णय विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) घेतला आहे. येत्या ३१ मेपर्यंत हे निर्बंध कायम राहतील,



असे स्पष्ट करण्यात आले आहे. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर २५ मे २०२० पासून देशांतर्गत विमान वाहतुकीला परवानगी देण्यात आली होती. परंतु, आंतरराष्ट्रीय प्रवासावरील निर्बंध कायम ठेवण्यात आले. कोरोना संक्रमण आटोक्यात येत नसल्याने निर्बंधात टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात आली. मार्च महिन्यात डीजीसीएने काढलेल्या अधिसूचनेनुसार आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतुकीवरील निर्बंध ३० एप्रिलपर्यंत कायम राहणार होते. परंतु, ३० एप्रिल रोजी काढलेल्या नवीन आदेशांनुसार या निर्बंधांत आणखी महिनाभर वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, या निर्बंधांतून काही ठरावीक शेड्यूल्ड विमानांना सूट देण्यात येईल. तसेच सर्व प्रकारची मालवाहतूक कोणत्याही निर्बंधांविना सुरू राहणार असल्याचे डीजीसीएने स्पष्ट केले.

## वर्षभरात मुंबईतील १२४ मद्यालये बंद

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** गेल्या वर्षीची टाळेबंदी, आता लागू केलेले निर्बंध या कालावधीत मद्यविक्रीला परवानगी असली तरीही जागेचे भाडे, मनुष्यबळावरील खर्च हा जामानिमा परवडत नसल्यामुळे मुंबईतील सुमारे १२४ मद्यविक्रेत्यांनी त्यांचे परवाने उत्पादन शुल्क विभागाकडे परत दिले आहेत. मद्य परवाने परत करणाऱ्यांमध्ये मोठ्या मद्यालयांच्या मालकांचे (बार) प्रमाण सर्वाधिक आहे. यंदाही बहुतांश मद्यालयांनी त्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण केले नाही. त्यामुळे आणखीही काही मद्यविक्री अस्थापने बंद होण्याची शक्यता आहे.

तोटा सहन करून अनुज्ञप्ती कायम ठेवण्याऐवजी मुंबईतील सुमारे १२४ मद्यविक्री अस्थापनांनी त्यांचे परवाने उत्पादन शुल्क विभागाला परत केले. यात मुंबई उपनगरातील ७४ तर मुंबई शहरातील सुमारे ५० आहेत. यंदा त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. परवाने परत करणाऱ्यांमध्ये मद्यविक्री करणाऱ्या दुकानांपेक्षा मद्यालय (बार) चालकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. गेल्या वर्षभरात १०० हून अधिक बारचालकांनी त्यांचे परवाने उत्पादन शुल्क विभागाकडे हस्तांतरित केले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

गेल्या वर्षी मे महिन्यात मद्यविक्रीच्या दुकानांनी (वाईन शॉप, बीयर शॉप) घरपोच मद्य पुरवण्याची सुविधा सुरू केली. मात्र त्यावेळी मद्यालयांना (बार) घरपोच मद्यविक्री करण्यास परवानगी देण्यात आली नव्हती. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात बारचालकांनाही पार्सल देण्याची




परवानगी देण्यात आली. मात्र त्याला ग्राहकांकडून अपेक्षित असा प्रतिसाद नव्हता. सरकारने ऑक्टोबर महिन्यात बार ५० टक्के क्षमतेने सुरू करण्याची परवानगी दिली. जवळपास आठ ते दहा महिने बारचालकांचा व्यवसाय बुडला. परिणामी जागा, मनुष्यबळ, सजावट, देखभाल, वीज, विविध कर, यांचा खर्च भागवणे जिकिरीचे झाले. मार्चअखेरीस या आस्थापनांनी त्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण करणे अपेक्षित असते.

मुंबईतील साधारण १७० अस्थापनांनी त्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण केले नाही. मुंबई उपनगरात सुमारे १५०० बार आहेत. त्यातील ४३ बारचालकांनीच परवान्यांचे नूतनीकरण केले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कमला मिल, बीकेसी, वरळी, परळ, खार आदी उच्चभ्रू परिसरात उच्चभ्रू परिसरात कॉर्पोरेट कंपन्यांची कार्यालये आहेत. मात्र या भागातील बहुतांश कार्यालये अद्यापही पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नाहीत.

## कर्जरोख्यांतून चार हजार कोटींचा निधी

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** नवीन आर्थिक वर्ष सुरू होताच करोना नियंत्रणासाठी लावलेल्या टाळेबंदीसदृश निर्बंध तसेच लसीकरणाकरिता साडेसहा हजार कोटींची तरतूद केल्याने महसूल कोंडी झालेल्या राज्य सरकारने तातडीचा उपाय म्हणून कर्जरोख्यांच्या विक्रीतून चार हजार कोटी रुपयांचा निधी उभारण्याचा निर्णय घेतला आहे. करोनामुळे आर्थिक नियोजन कोलमडले असताना १० हजार २२६ कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी मार्चमध्ये विधानसभेत सादर केला होता. २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात महसुली जमा ३ लाख ६८ हजार ९८७ कोटी रुपये राहील आणि खर्च ३ लाख ७९ हजार २१३ कोटी रुपये राहून १० हजार २२६ कोटी रुपयांची महसुली तूट राहील, असा अंदाज वर्तविण्यात आला होता. मात्र लसीकरणावरील तरतूद, वाढलेली रुग्णसंख्या आणि



निर्बंधांमुळे राज्याची महसूल कोंडी झाली आहे. त्यामुळे कर्जरोख्यांतून चार हजार कोटी रुपयांचे कर्जरोखे विक्री करण्यात येतील. गेल्या वर्षी मार्चअखेरीस केंद्र सरकारने देशव्यापी टाळेबंदी लावल्याने तिजोरीत संपूर्ण खडखडाट असल्याने एप्रिलमध्ये महाराष्ट्राला सात हजार कोटी रुपयांचा निधी कर्जरोख्यांतून उभारावा लागला होता. राज्य सरकारने २०२०-२१ या नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षांत ६९ हजार कोटी रुपयांचा निधी कर्जरोख्यांच्या विक्रीतून उभारला. त्याआधीच्या म्हणजेच २०१९-२० या आर्थिक वर्षाशी तुलना करता हे प्रमाण २० हजार ५०० कोटींनी म्हणजेच ४० टक्क्यांनी जास्त आहे. २०१९-२० मध्ये महाराष्ट्राने ४८ हजार ४९८ कोटी रुपये कर्जरोख्यांच्या विक्रीतून उभारले होते. लसीकरणासाठी साडेसहा हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने राज्याचे सारे आर्थिक नियोजन कोलमडले. मार्चमध्ये राज्यातील अर्थचक्र सुरू होते.

## बारावीचाच अभ्यास करायचा? की प्रवेश परीक्षांचा?

**मुंबई (राजेश गायकवाड)-** कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे एप्रिल-मे महिन्यात होणाऱ्या बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. बारावीची परीक्षा मे अखेरीस होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, आता एप्रिल महिना संपत आला, तरीही बारावीच्या परीक्षेबाबत अनिश्चितता कायम आहे. यामुळे अजून किती वेळ बारावीचाच अभ्यास करायचा? बारावीनंतर विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांची तयारी कधी करायची ? असे प्रश्न विद्यार्थ्यांना सतावू लागले आहेत. ऑफलाईन परीक्षा होणार की नाही ? अंतर्गत मूल्यमापनाचा पर्याय स्वीकारणार का? तसेच जर लेखी परीक्षा होणार असतील तर वेळापत्रक अद्याप जाहीर न झाल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षक गोंधळात पडले आहेत.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक अद्याप जाहीर न झाल्याने हा संभ्रम वाढत आहे. यापूर्वी २३ एप्रिल ते २१ मे २०२१ दरम्यान ही परीक्षा घेण्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. मात्र, राज्यात कोरोनाचा संसर्ग वाढत असल्याने बारावीची परीक्षा पुढे ढकलण्यात आली. आता ही परीक्षा मे अखेरीस होईल, असे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी २० एप्रिल रोजी जाहीर केले होते. बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेसाठी यंदा जवळपास १४ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

बारावीनंतरच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी बारावीचे गुण आणि प्रवेश परीक्षेचे गुण दोन्ही महत्त्वाचे असतात. त्यामुळे बारावीची परीक्षा होणे गरजेचे आहे, अशी आग्रही मागणी होत आहे.

## बचत गटांची अवस्था बिकट

**मुंबई (योगेश होळंब)-** देशात गेल्या पंचवीस वर्षापासून महिलांना त्यांच्या पायावर उभ्या करणाऱ्या बचतगटांच्या चळवळीला गेल्या वर्षभरात अत्यंत अवघड स्थितीला सामोरे जावे लागत आहे. करोनामुळे अनेक बचतगटांचे काम बंद आहे. त्यामुळे त्यांनी व्यवसाय उभारणीसाठी घेतलेल्या कर्जांचे हप्ते थकले आहेत. कोणतीही मदत मिळाली नसल्याने त्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. महिला बचत गटांच्या जाळ्यामार्फत राज्यभरातील गृहिणींना रोजगाराची संधी मिळाली. देशात १९९० नंतर रुजलेल्या या चळवळीने गाव आणि शहरगावांतील हजारो महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले. ग्रामीण भागांतील अर्थकारणात बचतगटांचे महत्वाचे स्थान आहे.

अंगणवाड्यांना पोषण आहार पुरविणे, हॉटेल्सना पोळ्या, भाकरी पुरवणे, खानावळी सुरू करणे, पापड, लोणची तयार करणे यांपासून शिलाईकाम, हस्तकला, खाद्यान्नप्रक्रिया उद्योग



यांमाध्यमातून महिलांनी स्वयंरोजगार निर्माण केला. मात्र गेल्यावर्षी टाळेबंदी जाहीर झाल्यानंतर इतर क्षेत्रांवर झालेल्या परिणामाचे पडसाद बचतगटांच्या कामावरही उमटले. गेल्या वर्षभरापासून अनेक बचतगटांकडे कामे नसल्याने या महिलांची परिस्थिती बिकट झाली आहे. यापूर्वी बचतगटांनी घेतलेले कर्ज फेडणेही या महिलांना जिकरीचे झाले आहे.

'आमच्या बचत गटात १२ महिला होत्या. त्यातील काहीजणी आता गावी निघून गेल्या आहेत. तर आम्ही कामाच्या शोधात आहोत. करोनाची रुग्ण संख्या वाढू लागल्याने सोसायटीत प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे घरकामही कुठे मिळेनासे झाले आहे. ' असे वाशी नाका परिसरातील एकता महिला बचत गटाच्या जयश्री मैराळे यांनी सांगितले. तर 'गेल्या २० वर्षांपासून बचत गट चालवत आहे. बचत गटात आम्ही १० महिला आहोत. आतापर्यंत ४ वेळा कर्ज घेतले आहे. तीनदा सर्व कर्ज वेळेत फेडले.

# देशाला कोरोनाच्या खाईत ढकलून निवडणुका जिंकायला निघालेल्या सत्तापिपासू भाजपला जनतेने धडा शिकवला



**मुंबई (सम्यक कासारे)-** पाच राज्यांच्या निवडणूक निकालावर प्रतिक्रिया व्यक्त करताना नाना पटोले म्हणाले की, कोरोनाच्या महाभयंकर संकटकाळात बेड्स, ऑक्सिजन, औषधे, रेमडेसिवर इंजेक्शन याच्या तुटवड्यामुळे देशात दररोज हजारो लोक मृत्यूमुखी पडत आहेत. अशा परिस्थितीतही देशाचे पंतप्रधान मरणा-या लोकांना वाचविण्याऐवजी पश्चिम बंगालमध्ये एका महिलेला हरवून सत्ता मिळविण्यासाठी प्रचार करत होते. देशाच्या इतिहासात असे चित्र कधी दिसले नव्हते. या निवडणूकीच्या प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा असंवेदनशील, क्रूर आणि भेसूर चेहरा देशासोबतच जगाने पाहिला. जगभरातील माध्यमांनी त्यांच्या या असंवेदनशील आणि बेफिकीरपणाची चिरफाड केली. आजच्या निकालातून पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडूच्या जनतेने निवडणुका जिंकून सत्ता मिळवण्यासाठी अत्यंत खालच्या पातळीवर गेलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला सणसणीत चपराक लगावली आहे.

भारतीय जनता पक्षाने आपल्या नेहमीच्या कार्यपद्धतीने धार्मिक तणाव निर्माण करून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न या निवडणुकीतही केला. केंद्र सरकारच्या अख्त्यारितील विविध संस्थांचा सायासाठी पुरेपूर गैरवापर केला पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. कोरोनाचे नियम पायदळी तुडवत सत्तेसाठी कोट्यवधी लोकांचे आरोग्य धोक्याच टाकणा-या केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि निवडणूक आयोग या दोघांवरही न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. बंगाल, केरळ, तामिळनाडूच्या सूज्ञ जनतेने दिलेला कौल आपल्या बेजबाबदार केंद्र सरकारला व आपली स्वायत्ता गहाण ठेवून केंद्रातील सत्ताधा-यांना शरण गेलेल्या सर्वांसाठी धडा आहे. या निवडणुकांचे निकाल काँग्रेस पक्षासाठी फारसे उत्साहवर्धक नाहीत. पण आमच्या नेत्या आदरणीय सोनियाजी गांधी व राहुलजी गांधी यांनी निवडणुकीतील विजयापेक्षा जनतेच्या आरोग्याला प्रथमिकता देत प्रचार आवरता घेतला होता. जनतेने दिलेला कौल आम्हाला मान्य असून काँग्रेस पक्ष निकालावर मंथन करेल. पंढरपूर विधानसभा पोटनिवडणुकीत स्थानिक मुद्दे आणि विठ्ठल कारखान्यांच्या थकित बिलांचा मुद्दा प्रभावी ठरल्याने महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा पराभव झाला आहे. जनमताचा कौल आम्ही विनम्रपणे स्वीकारतो, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# परमबीर सिंग यांच्यानंतर आता पोलीस महासंचालकांनी टाकला लेटर बॉम्ब, गृहखात्यात खळबळ

**मुंबई (योगेश होळंब)-** मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्या पत्रामुळे महाविकास आघाडी सरकारमध्ये बरीच उलथापालथ झाली. आता पोलीस महासंचालक संजय पांडे यांनीही राज्य सरकारला एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी परमबीर सिंग यांच्या चौकशी करण्यास नकार दिला आहे. पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी गृहखात्याला एक पत्र लिहिले आहे. त्यांच्या या पत्रामुळे एकच खळबळ उडाली आहे. परमबीर सिंग यांनी नुकतेच उच्च न्यायालयात संजय पांडे यांच्या विरोधात याचिका केली आहे. या याचिकेत अनिल देशमुख यांच्यावरील १०० कोटी वसूली प्रकरणी आरोप मागे घेण्यासाठी संजय पांडे दबाव टाकत असल्याचे आरोप करण्यात आले आहे. त्यानंतर आता संजय पांडे यांनी राज्य सरकारला पत्र लिहून चौकशी करण्यास नकार दिला आहे.



परमबीर सिंग यांच्या याचिकेवर ५ मे रोजी सुनावणी होणार आहे. पण त्याआधीच त्यांनी पत्र लिहून परमबीर सिंग यांची चौकशी करण्यात नकार दर्शवला आहे.

विशेष म्हणजे, पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी परमबीर सिंग यांच्या चौकशीचे आदेश दिले होते. पोलीस अधिकारी अनुप डांगे यांनी तक्रार केली होती. डांगे यांनी परमबीर सिंह यांच्यावर अंडरवर्ल्डसोबत संबंध आणि भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. २०१९ मध्ये डांगे यांनी एका पबवर धाड टाकली होती. तेव्हा तत्कालीन मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्या नावाने पब मालकाने डांगे याने धमकी दिली होती. नंतर डांगे यांना खातेनिहाय चौकशी करुन निलंबित करण्यात आले होते. पुर्ननियुक्ती करण्यासाठी डांगेंकडून परमबीर सिंह यांच्या खास माणसांनी २ कोटी रुपये मागणी केली होती. या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते.

# अदार पुनावालांनी माहिती द्यावी, धमकी देणाऱ्यांवर कारवाई करण्याचं गृह राज्यमंत्र्यांचं आश्वासन

**अहमदनगर (विशाल पाटील)-** कोविशिल्ड लसीची निर्मिती करणाऱ्या सीरम इन्स्टिट्यूटचे सीईओ अदार पुनावाला यांनी लंडनमध्ये दिलेल्या एका मुलाखतीनं सध्या खळबळ उडाली आहे. पुनावाला यांनी लसीच्या मुद्द्यावरून त्यांच्यावर काही बड्या व्यक्तींनी दबाव टाकत धमकीवजा फोन केल्याचं म्हटलं आहे. यावर पुनावाला यांनी सरकारला माहिती द्यावी अशा लोकांवर सरकार कारवाई करेल असं आश्वासन राज्याचे गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी दिलं आहे.सीरमचे सीईओ अदार पुनावाला हे सध्या इंग्लंडमध्ये त्यांच्या कुटुंबीयांबरोबर आहेत. देशात कोरोनाच्या लसींचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर आपल्यावर मोठ्या प्रमाणात दबाव असल्याचं पुनावाला यांनी लंडनमध्ये एका मुलाखतीत सांगितलं. कोरोनाच्या लसींसाठी देशातील अनेक बड्या व्यक्तींनी फोन करून दबाव टाकल्याचं पुनावाला यांनी सांगितलं. फोन करण्यांनी धमकीवजा इशारे दिल्याचंही त्यांनी म्हटलं होतं. फोन करणाऱ्यांमध्ये काही राज्यांचे मुख्यमंत्री आणि बड्या उद्योगपतींचा



समावेश होता, असंही त्यांनी मुलाखतीत सांगितलं. या प्रकारानंतर पुनावाला हे प्रचंड दबावात आणि घाबरलेलेही होते. या संपूर्ण प्रकारानंतर पुनावाला यांना Y दर्जाची सुरक्षा पुरवण्यात आली होती. हा संपूर्ण प्रकार अत्यंत गंभीर असल्याचं गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे. अदार पुनावाला हे जिथं कुठं असतील त्याठिकाणी त्यांनी पोलिसांना याबाबत माहिती द्यावी. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल, असंही देसाई यांनी म्हटलं आहे. तसंच पुनावाला यांना कुठून फोन आले, कोणी फोन केले याची चौकशी करून कारवाई करण्यात येईल असं आश्वासनही देसाईंनी दिलं आहे. अदार पुनावाला यांनी लवकरच भारतात परतणार असल्याचं म्हटलं आहे. तसंच कोरोनाच्या लसींचं उत्पादन पूर्ण क्षमतेनं सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे. याबाबतीत जे काही शक्य असेल ते करणार असल्याचं त्यांनी सांगितलंय. मात्र कोरोना विरोधातील लढ्यात अत्यंत महत्त्वाची अशी भूमिका बजावणाऱ्यांची काळजी घेणं गरजेचं आहे.

# नैसर्गिक आपत्तीत नागरिकांना वेळीच योग्य माहिती द्या; अधिक जागरूक राहून समन्वयाने काम करा - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची कोकण विभागातील जिल्हाधिकाऱ्यांना सूचना



**मुंबई (दिपेश गोरिवले)-** येणाऱ्या पावसाळ्यात नैसर्गिक आपत्तींचा अंदाज घेऊन सर्व यंत्रणांनी समन्वयाने व काळजीपूर्वक काम करावे तसेच नागरिकांना वेळीच सूचना मिळतील याची काळजी घ्यावी, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले. त्यांनी आज कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांचा पावसाळ्यापूर्वीच्या तयारीचा आढावा दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी बैठकीचे संचालन केले. यावेळी कोकणातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, तटरक्षक दल, मत्स्यव्यवसाय विभाग, हवामान विभाग, नौदल यांनी बैठकीत आपापल्या तयारीची माहिती दिली तसेच सूचना केल्या. मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव आबासाहेब जऱ्हाड, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, पोलीस महासंचालक संजय पांडे, पोलीस आयुक्त हेमंत नगराळे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, हवामान विभागाने पाऊस, वादळ व इतर आपत्तीविषयी प्रशासनाला अद्ययावत माहिती सातत्याने मिळत राहील तसेच त्यामुळे यंत्रणांना सावध राहून बचाव कार्य करता येईल याची काळजी घ्यावी. मासेमारी बोटींशी या काळात संपर्क असावा व त्यांना देखील सूचना मिळत राहतील ते पहावे. वीज प्रतिरोधक यंत्रणा, जिल्ह्याचे नियंत्रण कक्ष देखील व्यवस्थित कार्यान्वित असावेत याची काळजी घ्यावी.

गेल्या वेळेस तिवरे धरणाची दुर्घटना घडली होती. यंदा संबंधित सर्व यंत्रणांनी देखील मातीच्या धरणांची देखभाल व दुरुस्ती व्यवस्थित झाल्याची खात्री करून घ्यावी. तसेच आजूबाजूच्या गावातील लोकांना देखील सावध करावे आणि त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था करून ठेवावी. गेल्या वर्षी देखील पावसाळ्याच्या काळात पालघरमध्ये लहान लहान भूकंपांची मालिका सुरु झाली होती हे पाहता तेथील यंत्रणेने देखील सावध राहावे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

प्रारंभी कोकण विभागीय आयुक्त अण्णासाहेब मिसाळ यांनी सादरीकरण केले. गेल्या वर्षी विभागात ३१७३ मिमी पाऊस झाला होता असे सांगितले. विभागात ३७१ पूर प्रवण आणि २२३ दरडग्रस्त गावे आहेत. प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती नियंत्रण कक्ष सुरु झाले असून ते २४ तास सुरु राहणार आहेत. याशिवाय जीवरक्षक बोटी, जॅकेट व इतर सामुग्री उपलब्ध आहेत. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल तुकडी चिपळूण येथे तैनात ठेवण्यासाठी विनंती केली आहे, मॉक ड्रील झाले असून निसर्ग चक्रीवादळाच्या वेळेसची नुकसान भरपाई १०० टक्के दिली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

# आरटीओ एजंटकडून पावणे पाच लाखाची फसवणूक

**पुणे (अकिल शेख):** सहा हायवा (टिप्पर) गाड्यांचे पासिंग आणि रजिस्ट्रेशन करून देण्याचे सांगत एका आरोटीओ एजंटने पावणे पाच लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. कंपनीकडून पैसे घेऊनही पासिंग केले नसल्याचे सांगण्यात आले आहे.




याप्रकरणी विष्णू उर्फ विशाल सोनवणे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरटीओ एजंटचे नाव आहे. याबाबत युसूफ मूनशी यांनी मुंढवा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे डी.बी. गुप्ता रियल इन्फो लिमिटेड कंपनीत मॅनेजर म्हणून काम करतात. ते गेल्या एक वर्षापासून काम करत आहेत. त्यांचे कंपनीने सहा हायवा (टिप्पर) गाड्या खरेदी केल्या होत्या. त्याची पासिंग व रजिस्ट्रेशन आरटीओ कार्यालयात करायची होती. यादरम्यान त्यांनी एजंट विष्णू याला हे काम सांगितले. त्याने ६ गाड्यासाठी फिर्यादी यांच्या कंपनीकडून ४ लाख ७२ हजार रुपये घेतले. मात्र गाड्यांची पासिंग, रजिस्ट्रेशन करून न देता त्यांची फसवणूक केली आहे. अधिक तपास मुंढवा पोलीस करत आहेत.

# घरी जाताना गरोदर महिलेचा वेदनादायी मृत्यू, वीज अंगावर कोसळून शेवट

**बीड/नेकनूर (पीटीआय):** जिल्ह्यात शनिवार (ता.एक) व रविवार (दोन) असे दोन दिवस विजांचा कहर, अवकाळी पाऊस, गारपीट सुरूच आहे. दोन दिवसांत वीज पडल्याच्या चार घटना घडल्या. रविवारी नेकनूरला एका गर्भवतीचा मृत्यू झाला. शनिवारीही केज व धारूर तालुक्यातील बहुतांशी भागात वादळासह पावसाने हजेरी लावली. रविवारी सानपवाडी येथे वीज पडून दोन बैल ठार झाले. तर, बेंगळवाडी (ता. केज) येथे हनुमान मंदिराच्या



शिखरावर वीज कोसळली. वीज पडून नेकनूरमध्ये एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. याबाबत अधिक माहिती अशी की, रविवार (ता.दोन) रोजी दुपारी तीनच्या सुमारास नेकनूरमध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह पावसास सुरुवात झाली. विजेच्या कडकडाटासह वादळी वाऱ्याचा हा पाऊस जवळपास अर्धातास सुरू होता. या पावसामुळे अनेक झाडे उन्मळून पडली, तर या पावसामुळे नेकनूरमध्ये लोखंडे वस्ती येथील राधाबाई दीपक लोखंडे (वय २०) या महिलेचा अंगावर वीज पडल्याने जागीच मृत्यू झाला. राधाबाई आपल्याला नातेवाइकांसह वादळवारे सुटल्यामुळे घराकडे परतत होती, तेव्हा अंगावर वीज कोसळून जागीच ठार झाल्या. राधाबाई या आठ महिन्याची गर्भवती होती.

# मुंबईत ७ जणांनी घरात घुसून २० वर्षीय तरुणाची केली हत्या; दगड, पेव्हर ब्लॉकने घेतला जीव

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** घाटकोपरमधील पूर्व द्रुतगती महामार्गाच्या बाजूला असलेल्या रमाबाई आंबेडकर कॉलनी परिसरात काल मध्यरात्री २० वर्षीय तरुणाची सहा ते सात जणांनी बेदम मारहाण करीत



निर्घृण हत्या केल्याची घटना रात्री घडली आहे. विशाल राम कारंडे असे या मृत तरुणाचे नाव आहे. त्याचा या विभागातील काही व्यक्तींशी वाद होता. या वादातून काल रात्री १ वाजताच्या दरम्यान या गटातील सहा ते सात जण त्याच्या घरात घुसले आणि त्याला फरफटत बाहेर काढले. त्याला मारहाण करत दगड, पेव्हर ब्लॉक आणि धारधार शस्त्रांनी हल्ला केला. यात त्याचा मृत्यू झाला. ही घटना इथल्या सीसीटीव्ही मध्ये सुद्धा ही कैद झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पंतनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गंभीर जखमी अवस्थेत राजावाडी रुग्णालयात उपचारासाठी भरती केलं. पण तिथे त्याचा मृत्यू झाला. विशाल याचे वडील राम कारंडे यांच्या तक्रारीवरून पंतनगर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केलाराम कारंडे यांनी याच विभागात राहत असलेले आरोपीचे नावे दिल्यावरून मुख्य आरोपी मनोज रनशूर ऊर्फ भावड्या यांच्यासह इतर सहा जणांविरुद्ध विविध कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये किरण निर्भवणे ऊर्फ सोन्या, विवेक मोकल, अजय मोकल, अजय अहिरे, शिवम गवळी, साहिल जाधव यांचा समावेश असून सर्वजणं रमाबाई नगर, घाटकोपर येथे राहणारे असून त्यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. इतर दोन ते तीन जणांचा शोध सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच आज सकाळी या विभागात सकाळपासून मोठी तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. घटनास्थळी सध्या मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जेव्हा या मृत तरुणाची अंत्ययात्रा निघाली तेव्हा शेकडोच्या संख्येने स्थानिक त्यात सामील झाले होते, पोलिसांनी त्यांना रोखण्याचा मोठा प्रयत्न देखील केला. अखेर मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही प्रेत यात्रा स्मशानभूमी पर्यंत गेली. या प्रकरणी सध्या पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतले आहे.

# निलेश राणेंची महाविकास आघाडीच्या नेत्यांवर बोचरी टीका, म्हणाले-'ममता बॅनर्जींचे कसंल गुणगाण गाताय? भाजपने पंढरपूरमध्ये तुम्हाला घरात शिरून ठोकलंय'

**मुंबई (नितीन देवळेकर)-** अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाला पराभूत करत ममता बॅनर्जी यांच्या टीएमसीने विजयाची हॅटट्रिक साधली आहे. तर दुसरीकडे राज्यातील अत्यंत अटीतटीच्या झालेल्या पंढरपूर – मंगळवेढा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या समाधान अवताडे यांनी भगिरथ भालकेंचा ३ हजार ७१६ मतांनी पराभव केला. दरम्यान या विजयानंतर भाजपाचे नेते आणि माजी आमदार निलेश राणे यांनी ट्विट करून महाविकास आघाडीच्या नेत्यांवर बोचरी टीका केली आहे. पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जींचे कसंल गुणगाण गाताय ? भाजपने पंढरपूरात तुम्हाला घरात शिरून ठोकलंय असे म्हणत टीकास्त्र सोडलं आहे. त्या अजित पवारांना शोधा.. नेहमी सांगतात तीन पक्ष एकत्र आल्यावर कोणाची मायची अवलाद हरवू शकत नाही. तुमच्या घरात शिरून बीजेपी ने तुम्हाला ठोकलय. ममता बॅनर्जींचं कसलं गुणगान गाताय?? बंगाल मध्ये तुमच्या तीन पक्षाच्या नावाचा कुत्रा सुद्धा नाही. संज्या तू स्वतः कधी निवडून येणार ते सांग?



# चढया दराने रेमडेसिवीरची विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोघा सख्ख्या भावांना आणि त्यांच्या मैत्रीणीचा पर्दाफाश; तिघे बी-फार्म Pass

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** काळ्या बाजारात चढ्या दराने रेमडेसिवीर इंजेक्शन विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोघा सख्या मावस भावांना आणि त्यांच्या मैत्रीणीचा गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. दोघांना सापळा रचून अटक केली आहे. त्यांच्याकडून ३ इंजेक्शन जप्त करण्यात आले आहेत. तरुण-तरुणी बी-फार्मसी शिक्षण झालेले आहे. निखिल बाबुराव जाधव (वय २४, रा. आंबेगाव पठार) व मयूर विजय चव्हाण (वय २२, रां वराळे, तळेगाव दाभाडे) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. तर शामली अकोलकर हिच्यावर भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरात कोरोना रुग्णांसाठी लागणाऱ्या रेमडेसिवीर या इंजेक्शनचा गेल्या काही दिवसापासून काळा बाजार सुरू आहे. चढया दराने या




इंजेक्शनची काळ्या बाजारात विक्री केली जात आहे. त्यानुसार पोलीस या काळा बाजारावर रोख लावत आहेत. या दरम्यान गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथक (१) हे गस्त घालत असताना कर्मचारी राजेंद्र लांडगे व विवेक जाधव यांना नवले पूल परिसरात या इंजेक्शनची विक्री केली जाणार असल्याची माहिती मिळाली. यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक तयार केले आणि त्यांच्याकडे इंजेक्शन खरेदीसाठी पाठवले. त्यावेळी शामली ही तरुणी दोघांमार्फत इंजेक्शन विक्री करताना समोर आले. त्यांनी ३७ हजार रुपयांना एक असे १ लाख ५ हजार रुपयांना तीन इंजेक्शन देण्याचे ठरविले. त्यानुसार इंजेक्शन घेताना या दोघांना अटक करण्यात आली आहे. तर त्या तरुणीला आज ताब्यात घेतले जाणार असल्याची माहिती आहे. त्यांच्याकडे ३ इंजेक्शन, कार आणि मोबाईल असा ८ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

# राज ठाकरेंकडून ममता बॅनर्जींचे 'मनसे' अभिनंदन

**मुंबई (जसबीरकौर भामरा)–** पश्चिम बंगालच्या जनतेने देशभरामध्ये चर्चेत असणाऱ्या पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसच्या बाजूने कौल दिला आहे. ममता बॅनर्जीच पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदी विराजमान होणार हे आता जवळजवळ स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी याच पार्श्वभूमीवर ममता यांना निवडणुकीतील विजयासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. राज ठाकरे यांनी ममता बॅनर्जींना गुलाबांचा गुच्छ देतानाचा स्वत:चा जुना फोटो पोस्ट करत महाराष्ट्राचा उल्लेख असणाऱ्या काही ओळी लिहीत ममतांचे अभिनंदन केले आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांमध्ये मिळवलेल्या लक्षणीय यशसाठी ममता बॅनर्जीचे अत्यंत मनापासून अभिनंदन. संघर्ष हा तुमच्या राजकारणाचा स्थायीभाव राहिला आहे आणि या



निवडणुकीत संघर्षाची परिसीमा गाठत तुम्ही हे नेत्रदीपक यश मिळवले. कलासक्त वृत्ती आणि सामाजिक सुधारणांची खूप मोठी परंपरा या बाबतीत महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल यांच्यात खूपच समानता आहे, आणि त्यामुळेच राज्यांची स्वायत्तता आणि प्रांतिक अस्मिता यांचे महत्व तुम्ही नक्कीच समजू शकता. राज्यांच्या स्वायत्ततेसाठीचा आग्रही आवाज तुम्ही बनाल आणि सर्वसामावेशक भूमिका घेत पश्चिम बंगालचा विकास साधाल अशी आशा मी व्यक्त करतो, असे राज यांनी म्हटलं आहे. तसेच या पोस्टमध्ये त्यांनी, तुम्हाला मिळालेल्या यशासाठी मी तुमचे आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याचं मनापासून अभिनंदन करतो, असेही म्हटले आहे.